<u>नि. फौ. ख. क्र.३९५/२०२१</u> निशाणी २२

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.१ यांचा शपथेवर जबाब</u>**
**<u>मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,</u>**

नाव – अनंतराव काशिराम वडतकार

वय – ४४ वर्षे, व्यवसाय – सहा पोलीस निरीक्षक, पो.स्टे. रहेमापुर, अमरावती

पत्ता – रा. दर्यापुर, ता. दर्यापुर, जि. अमरावती

**<u>सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती एस. आर. लोखंडे यांचेमार्फत सरतपास सुरुः</u>**

१. दि.०१.०४.२०२१ रोजी मी पो.स्टे. उरळ येथे प्रभारी अधिकारी म्हणून कार्यरत होतो. सदरहू दिवशी नायब तहसिलदार नंदकिशोर नाजुकराव कुंभरे यांनी पो.स्टे. उरळ या ठिकाणी २ ब्रास रेती असलेला ट्रक क्र. एमएच२८/बीबी/१०२६ हा अवैध रेती वाहतुक करीत असलेला ट्रक आरोपीसह पो.स्टे. येथे आणला. सदर तहसिलदार यांनी पो.स्टे. येथे अवैध रेती वाहतूक करीत असल्याबाबत ट्रक चालक राजेश काळे याच्या विरुध्द फिर्याद दिली. त्यावरुन अप क्र.१३९/२०२१, भादंवि कलम ३७९ दाखल करण्यात आला. सदर गुन्ह्याच्या तपासकामी तहसिलदार यांनी हजर केलेल्या दोन ब्रास रेतीसह ट्रक जप्ती पत्रकाद्वारे आरोपीकडून जप्त केला. आता मला सदर जप्ती पत्रक दाखविण्यात आले त्यावर माझी, दोन पंच व आरोपीची सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२३** देण्यात येत आहे. मी आरोपी राजेश काळे यास ओळखतो. आरोपी राजेश काळे आज न्यायालयात हजर असल्याबाबत साक्षीदार यांनी सांगितले. सदर गुन्ह्याचा पुढील तपास हेकॉ अनिल येन्नेवार यांनी केला. सदर तपासकामी माझा जबाब त्यांनी नोंद केला होता.

सरतपास पूर्ण.

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. बी. पी. उपर्वट यांचे मार्फत उलटतपासः</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, तपासिक अधिकारी यांनी माझा कोणत्या तारखेला नोंद केला ती तारीख मला आठवत नाही. जप्ती पंचनामा करण्याकरीता पंचांना मी लेखी नोटीस दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी जप्ती पंचनामा केला नाही, म्हणून पंचांना

लेखी नोटीस दिली नाही. फिर्यादीचे तहसिलदार असल्याबाबतचे ओळखपत्र मी सदर फिर्याद नोंद करण्यापुर्वी पाहिले नव्हते. जप्त केलेल्या रेतीबाबत मी ती कोठून आणली व कोठे घेवून जात आहेत, याबाबत चौकशी केली नाही. सदर ट्रकच्या मालकीबाबत मी कोणतीही चौकशी गुन्हा दाखल करतेवेळी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सरतपासादरम्यान कथन केलेल्या सर्व बाबी खोट्या सांगितलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

**दिनांकः– २२.०१.२०२६**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE
Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2026.01.22 17:43:13 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :– | **श्री. डी. एम. वाघमारे,** सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :– | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :– | २२/०१/२०२६ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :– | २२/०१/२०२६ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :– | २२/०१/२०२६ |